RNI No. MAHBIL /2009/35529

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक १४] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २-८, २०२६, चैत्र १२-१८, शके १९४८ [पृष्ठे ४८, किंमत : रुपये १४.००

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय अधिसूचना, नेमणूका इत्यादी

BY THE DISTRICT COURT, SINDHUDURG, AT OROS

Order

No.Admn./746/2026. —Shri Y. P. Bavkar, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg, is granted earned leave for 3 days as *ex-post-facto* from 24th February 2026 to 26th February 2026.

No locum tenens is necessary.

On return from leave Shri Y. P. Bavkar, is re-posted as Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule 1981, Shri Y. P. Bavkar. is reposted as Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg, had he not proceeded on leave as above.

During the abovesaid period, the charge of the Court of the. Civil Judge (J.D.) and J.M.F.C. Dodamarg, was already kept with Smt. J. M. Mistry, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi.

The Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg, is directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officer concerned.

DR. SUDHIIR DESHPANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg at Oros.

Sindhudurg,
dated 26th February 2026.

BY THE DISTRICT COURT, SINDHUDURG, AT OROS

Order

No.Admn./747/2026. —Smt. R. G. Kumbhar, Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi, is granted commuted leave *ex-post-facto* for 13 day from 12th February 2026 to 24th February 2026.

No locum tenens is necessary.

On return from leave Smt. R. G. Kumbhar, is reposted as Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule 1981, Smt. R. G. Kumbhar, would have been continued to an officiate as Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi had she not proceeded on leave as above.

During the abovesaid period from 12th February 2026 to 15th February 2026 the charge of the Court of the Extra Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kudal was already kept with Shri G. A. Kulkarni Civil Judge (J.D.) and J.M.F.C.,Kudal and the charge of the Court of Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi from 16th February 2026 to 24th February 2026 was kept with Smt. J. M. Mistry, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi.

The Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi is directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officers concerned.

DR. SUDHIIR DESHPANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg at Oros.

Sindhudurg,
dated 26th February 2026.

BY THE DISTRICT COURT, SINDHUDURG, AT OROS

Order

No.Admn./716/2026. —Smt. V. S. Deshmukh, District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros is granted commuted leave for 01 day on 21st February 2026.

No locum tenens is necessary.

On return from leave Smt. V. S. Deshmukh, is reposted as District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule 1981, Smt. V. S. Deshmukh,would have been continued to an officiate as District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros had she not proceeded on leave as above.

During the abovesaid period the charge of the Cout of the District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros shall remain with Shri S. S. Indalkar, *Adhoc* District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros.

The District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros is directed to hand over the charge of her Court to the *Adhoc* District Judge-1 and Additional Sessions, Judge, Sindhudurg at Oros. She is also directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officers concerned.

DR. SUDHIIR DESHPANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg at Oros.

Sindhudurg,
dated 21st February 2026.

BY THE DISTRICT COURT, SINDHUDURG, AT OROS

Order

No.Admn./714/2026. —Smt. S. D. Gundewadi, Secretary, District Legal Services Authority, Sindhudurg at Oros is granted 01 day earnded leave *ex-post-facto,* on 6th February 2026 with permission to prefix earned leave of 03 days from 3rd February 2026 to 5th February 2026 and permission to leave headquarters in persuance of order passed on application at Sr. No. 4 above.

No locum tenens is necessary.

On return from leave Smt. S. D. Gundewadi, is reposted as Secretary, District Legal Services Authority, Sindhudurg at Oros.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule 1981, Smt. S. D. Gundewadi, would have been continued to an officiate as Secretary, District Legal Services Authority, Sindhudurg at Oros had she not proceeded on leave as above.

During the abovesaid period the charge of the office of the Secretary, District Legal Services Authority, Sindhudurg at Oros was already kept with Shri A. A. Chendke,Civil Judge (S.D.) and Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros.

Contents of this order be communicated to the officers concerned.

DR. SUDHIIR DESHPANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg at Oros.

Sindhudurg,
dated 23rd February 2026.

BY THE DISTRICT COURT, SINDHUDURG, AT OROS

Order

No.Admn./853/2026. —Shri Y. P. Bavkar, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg, is granted commuted leave *ex-post-facto* for 01 day on 2nd March 2026.

No locum tenens is necessary.

On return from leave Shri Y. P. Bavkar, is reposted as Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule 1981, Shri Y. P. Bavkar, would have been continued to an officiate as Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg, had he not proceeded on leave as above.

During the abovesaid period, the charge of the Court of the Civil Judge (J.D.) and J.M.F.C. Dodamarg on 2nd March 2026 was already kept with Smt. J. M. Mistry, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Sawantwadi.

The Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Dodamarg, is directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officers concerned.

DR. SUDHIIR DESHPANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg at Oros.

Sindhudurg,
dated 5th March 2026.

BY THE DISTRICT COURT, SINDHUDURG, AT OROS

Order

No.Admn./854/2026. —Smt. S. J. Patil, 3rd Jt. Civil Judge (S.D.) and Addtilonal Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros is granted leave for 04 days from 4th March 2026 to 7th March 2026 with permission to leave headquarters.

No locum tenens is necessary.

On return from leave Smt. S. J. Patil, is reposted as the 3rd Jt. Civil Judge (S.D.) and Addtilonal Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule 1981, Smt. S. J. Patil,, would have been continued to an officiate as 3rd Jt. Civil Judge (S.D.) and Addtilonal Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros, had she not proceeded on leave as above.

During the abovesaid period, the charge of the Court of the 3rd Jt. Civil Judge (S.D.) and Addtilonal Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros shall reamin with Shri A. G. Deshingkar, Jt. Civil Judge (S.D.) and Addtilonal Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros.

The 3rd Jt. Civil Judge (S.D.) and Addtilonal Chief Judicial Magistrate, Sindhudurg at Oros is directed to hand over the charge of her Court to Jt. Civil Judge (S.D.) and Additional Chief Judicial Magistratre, Sindhudurge at Ors. She is also directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officer concerned.

DR. SUDHIIR DESHPANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg at Oros.

Sindhudurg at Oros,
dated 5th March 2026.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांजकडून

अधिसूचना

क्रमांक उविअमा – भूसं / कात -२/ एस.आर. १७८ / २०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक, विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) चे कलम १, पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र,** भाग चार, ब, पृष्ठ क्र. ७ वर प्रसिद्ध करण्यात आलेली ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२६/ (प्र.क्र. ३३५)/ उ -१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास मार्च, २०२६ या महिन्याच्या चौथ्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी ह्या उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत ;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा " उक्त महामंडळ " असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी/१८९२ (१७४४१), उद्योग- १४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोट-कलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांची नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोट-कलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करून याद्वारे उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येऊ नये ? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कयदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

अनुसूची

जिल्हा रायगड, तालुका रोहा, गाव दुरटोली

अ. क्र.	सर्व्हे नंबर/ गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर.)
(१)	(२)	(३)	(४)
१.	७१	पैकी	०.०२०५
२.	७२	पैकी	०.०९३२
३.	७३	पैकी	०.३३४१
४.	७४	पैकी	०.०१९४
५.	६१३	पैकी	०.१४०२
६.	६१५	पैकी	०.४९४५
		एकूण	**१.१०९९**

डॉ. संदीपान सानप,
उप विभागीय अधिकारी,
माणगांव उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांजकडून

अधिसूचना

क्रमांक उविअमा भूसं/कात -२/ एस.आर.५४६/२०११.—ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) चे कलम १, पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र,** भाग चार-ब, पृष्ठ क्र. १ वर प्रसिद्ध करण्यात आलेली उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२६/ (प्र.क्र.३५)/उ -१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास मार्च, २०२६ या महिन्याच्या चौथ्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी ह्या उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत ;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा " उक्त महामंडळ " असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी / १८९२(१७४४१), उद्योग–१४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोट-कलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांची नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोट-कलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करून याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येऊ नये ? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

अनुसूची

जिल्हा रायगड, तालुका रोहा, गाव जामगांव

अ. क्र.	सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर.)
(१)	(२)	(३)	(४)
१.	५१०	०	४.०१००
२.	२३४	पैकी	०.१७६८
३.	२३७	पैकी	०.३७३४
४.	२३८	०	०.१०००
५.	२३९	पैकी	०.४९२९
		एकूण	**५.१५३१**

डॉ. संदीपान सानप,
उप विभागीय अधिकारी,
माणगांव उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांजकडून

अधिसूचना

क्रमांक उविअमा भूसं / कात-२/ एस.आर. ५४७/ २०११.—ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२चा महा. -तीन) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र,** भाग चार ब, पृष्ठ क्र. ०३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२६/ (प्र.क्र.३५)/उ -१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास मार्च २०२६ या महिन्याच्या चौथ्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी ह्या उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत ;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा " उक्त महामंडळ " असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्ट्यर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी/१८९२ (१७४४१), उद्योग-१४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोट-कलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांची नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोट-कलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करून याद्वारे उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधित भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येऊ नये ? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

अनुसूची

जिल्हा रायगड, तालुका रोहा, गाव पाथरशेत

अ. क्र.	सर्व्हे नंबर/ गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर.)
(१)	(२)	(३)	(४)
१.	९८	०	०.२१३०
२.	९९	०	०.०१५०
३.	५६६	०	०.२८१०
४.	५९४	०	०.०४१०
५.	५९४	०	०.०६००
६.	५९९	०	०.०३८०
७.	६००	अ	०.२३७०
		एकूण	**०.८८५०**

डॉ. संदीपान सानप,
उप विभागीय अधिकारी,
माणगांव उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव, यांजकडून

अधिसूचना

क्रमांक उविअमा भूसं/कात - २/एस.आर. ९५ /२०१२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२चा महा. - तीन) चे कलम १, पोट कलम (3) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र,** भाग चार-ब, पृष्ठ क्र. ४ वर प्रसिद्ध करण्यात आलेली ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०११/(३०७) / उद्योग - १४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास फेब्रुवारी, २०२६ या महिन्याच्या सतराव्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी ह्या उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत ;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा " उक्त महामंडळ " असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्ट्यर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी / १८९२(१७४४१), उद्योग-१४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३, पोट-कलम (२), कलम ३६ व कलम ३८खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोट-कलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करून याद्वारे उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधित भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येऊ नये ? या संबंधी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरूपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

अनुसूची

पाणसई औद्योगिक क्षेत्र

जिल्हा रायगड, तालुका माणगांव, गाव कोशिंबळे तर्फे निजामपूर

अ. क्र.	सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर.)
(१)	(२)	(३)	(४)
१.	७५	२	०.७६००

डॉ. संदीपान सानप,
उप विभागीय अधिकारी,
माणगांव उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांजकडून

शुद्धीपत्रक

क्रमांक उविअमा भूसं/कात-२/कोशिंबळे तर्फे निजामपूर./एसआर. ९५/२०१२.—दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी, माणगांव, उप विभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक उविअमा/भूसं/ कात-२/एसआर-९५/२०१२/दिनांक ७ जुलै २०१५ अन्वये मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जिल्हा रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२) ची अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग एक - कोकण विभागीय पुरवणी दिनांक जुलै १६ - २२, २०१५ रोजी प्रसिद्ध झाली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०११/(प्र.क्र.३०७)/उद्योग-१४, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ अन्वये मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील सर्व्हे नंबर हे खाजगी मधून सरकारी क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील**, भाग चार-ब, पृष्ठ क्रमांक ०१ ते ०२ मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी शुद्धीपत्रकान्वये जाहीर केले आहे ;

त्याअर्थी, जुलै १६ - २२, २०१५ रोजी **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग एक - कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(२) च्या अधिसूचनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अनुसूची

पाणसई औद्योगिक क्षेत्र

जिल्हा रायगड, तालुका माणगांव, गांव कोशिंबळे तर्फे निजामपूर

यापूर्वीचा तपशील			**वाचण्याचा तपशील (दुरुस्तीप्रमाणे)**		
सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर)	सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर)
(१)	(२)	(३)	(१)	(२)	(३)
४४	१	०.०४३	प्रस्तूत स.नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे.		
५१	५	०.१८०	प्रस्तूत स.नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे.		

डॉ. संदीपान सानप,
उप विभागीय अधिकारी,
माणगांव उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांजकडून

शुद्धीपत्रक

क्रमांक उविअमा /भूसं/कात-२/ कोशिंबळे तर्फे निजामपूर/एस.आर. ९५ /२०१२.—दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/ कात-२/एसआर - ९५/२०१२, दिनांक ४ ऑगस्ट २०१६ अन्वये मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जिल्हा रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) ची अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग एक - कोकण विभागीय पुरवणी दिनांक जुलै ११-१७, २०१६ रोजी प्रसिद्ध झाली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ९ डिसेंबर, २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०११/(प्र.क्र.३०७)/उद्योग-१४, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ अन्वये मौजे कोशिंबळे तर्फे निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील सर्व्हे नंबर हे खाजगी मधून सरकारी क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील**,भाग चार ब पृष्ठ क्रमांक ०१ ते ०२ मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी शुद्धीपत्रकान्वये जाहिर केले आहे.

त्याअर्थी, ऑगस्ट ११-१७, २०१६ रोजी **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग एक - कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(१) च्या अधिसूचनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अनुसूची

पाणसई औद्योगिक क्षेत्र

जिल्हा रायगड, तालुका माणगांव, गांव कोशिंबळे तर्फे निजामपूर

यापूर्वीचा तपशील			**वाचण्याचा तपशील (दुरुस्तीप्रमाणे)**		
सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.)	सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.)
(१)	(२)	(३)	(१)	(२)	(३)
४४	१	०.०४३	प्रस्तूत स.नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे.		
५१	५	०.१८०	प्रस्तूत स.नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे.		

डॉ. संदीपान सानप,
उपविभागीय अधिकारी,
माणगांव, उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उप विभागीय अधिकारी, माणगांव उप विभाग, माणगांव यांजकडून

शुद्धीपत्रक

क्रमांक उविअमा/भूसं/कात-२/पाणसई/एस.आर. ९७ /२०१२.—दुरुस्ती, उप विभागीय अधिकारी, माणगांव, उप विभाग माणगांव यांजकडील अधिसूचना क्रमांक/उविअमा/भूसं/ कात-२/एसआर - ९७/२०१२, दिनांक ७ जुलै २०१५ अन्वये मौजे पाणसई, ता. माणगांव, जिल्हा रायगड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२) ची अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग एक - कोकण विभागीय पुरवणी दिनांक जुलै १६ - २२, २०१५ रोजी प्रसिद्ध झाली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहा, दिनांक ९ डिसेंबर २०११ च्या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०११/(प्र.क्र.३०७)/उद्योग-१४, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ अन्वये मौजे - पाणसई, ता. माणगांव, जि. रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसूचनेतील सर्व्हे नंबर हे खाजगी मधून सरकारी क्षेत्रात समाविष्ट झाल्याबाबत **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील**,भाग चार-ब पृष्ठ क्रमांक ०१ ते ०२ मध्ये दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी शुद्धीपत्रकान्वये जाहीर केले आहे.

त्याअर्थी, जुलै १६-२२, २०१५ रोजी **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग एक - कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध झालेल्या उक्त अधिनियमातील कलम ३२(२) च्या अधिसूचनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

अनुसूची

पाणसई औद्योगिक क्षेत्र

जिल्हा रायगड, तालुका माणगांव, गांव पाणसई

यापूर्वीचा तपशील			**वाचण्याचा तपशील (दुरुस्तीप्रमाणे)**		
सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.)	सर्व्हे नंबर/गट नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.)
(१)	(२)	(३)	(१)	(२)	(३)
१७१	१५	०.०७०	प्रस्तूत स.नं. खाजगी अधिसूचनेतून वगळण्यात आला आहे.		

डॉ. संदीपान सानप,
उप विभागीय अधिकारी,
माणगांव, उप विभाग, माणगांव.

माणगांव,
दिनांक १८ मार्च २०२६.

उपविभागीय अधिकारी, राजापूर यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक उविअरा/भूसंपादन/एसआर.-१६४ /कोलेवाडी/२०२३.—ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुका द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता क्षेत्र जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजसाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) तिची आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे. उक्त अधिनिमयाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहे ; (विस्थापन होणार असेल या अनुसूची मध्ये कारणे नमूद करावीत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र,** भाग चार-अ, क्रमांक ३८, दिनांक १३ मार्च २०१५ च्या अनुक्रमांक (क) अन्वये " संरक्षण सिद्धता " किंवा संरक्षण विषयक उत्पादन यासह भारताची राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षण या दृष्टीने महत्त्वाचे असे प्रकल्प यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई करण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आली आहे. ज्याबाबत विस्तृत विवरण अनुसूची चार मध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करणेत येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम (११) पोट-कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकांने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकांस उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही :

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यायावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (उ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, राजापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

जमिनीचे वर्णन –	मोजे कोलेवाडी लघु पाटबंधारे योजनेच्या सी. मुख्य कामी अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.
गावाचे नाव –	मौजे कोलेवाडी, तालुक लांजा, जि. रत्नागिरी.

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक किंवा गट नंबर/सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
(१)	(२)	(३)
१	४८ पै	०.०५.००
२	५० पै	०.०३.००
३	५४ पै	०.०६.००
४	५५ पै	०.०२.००
५	६१ पै	०.१०.००
६	६२ पै	०.१२.००
७	८६ पै	०.०९.००
८	८७पै	०.११.००
९	८८ पै	०.१४.००
१०	१६५ पै	०.०३.००
११	१६७ अ पै	०.०१.००
१२	१६८ पै	०.०८.००
१३	१६९ पै	०.१३.००
१४	१७० पै	०.०१.००
१५	१७१ पै	०.०७.००
१६	१७२ पै	०.०२.००
१७	१७३ पै	०.०७.००
१८	१७४ पै	०.१६.००
१९	१८० पै	०.०३.००
२०	१८१ पै	०.०६.००
२१	१८३ पै	०.०३.००
२२	२०३ पै	०.०७.००
२३	२०४ पै	०.०६.००
२४	२०५ पै	०.०३.००
२५	२२७ पै	०.०७.००
२६	२२८ पै	०.०७.००
२७	२४९ पै	०.०३.००
२८	२५० पै	०.०४.००
२९	२६३ पै	०.०९.००
३०	२६४ पै	०.०६.००
३१	२६५ पै	०.०४.००
३२	२६६ पै	०.०३.००
३३	२६९ पै	०.०८.००
३४	२७० अ पै	०.१२.००
३५	२७० ब पै	०.०३.००

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक किंवा गट नंबर/सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
(१)	(२)	(३)
३६	२७० ड पै	०.०६.००
३७	२७५ पै	०.०९.००
३८	२८५पै	०.०८.००
३९	२८६ पै	०.१३.००
४०	३०७ पै	०.०२.००
४१	३१३ पै	०.१८.००
४२	३१४ पै	०.०८.००
४३	३१५ पै	०.१६.००
४४	३१६ पै	०.१०.००
४५	३३१ पै	०.१८.००
४६	३३४ पै	०.१८.००
४७	३३५ पै	०.५१.००
४८	३३६ पै	०.५०.००
४९	३३७ पै	०.४५.००
५०	३३९ पै	०.०४.००
५१	३४० पै	०.१५.००
५२	३६६ पै	०.०८.००
५३	३६७पै	०.५६.००
५४	३६८पै	२.२१.००
५५	३६९	०.०८.००
५६	३७०पै	०.४२.००
५७	३७१	०.३८.००
५८	३७२ पै	०.३२.००
५९	३७३ पै	०.०९.००
६०	३८० पै	०.७४.००
६१	३८१	०.७९.००
६२	३८२ पै	२.१३.००
६३	३८३	३.२१.००
६४	३८४	०.४५.००
६५	३८५	०.३०.००
६६	३८६	०.७०.००
६७	३८७	०.४४.००
६८	३८८पै	१.१३.००
६९	३८९	०.२६.००
७०	३९०	०.२७.००

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक किंवा गट नंबर/सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
(१)	(२)	(३)
७१	३९१	०.२३.००
७२	३९२ पै	०.७९.००
७३	३९४ पै	०.१०.००
७४	४०९ पै	०.५७.००
७५	४१० पै	०.२२.००
७६	४११ पै	०.२५.००
७७	४१२ पै	०.१६.००
७८	४१३ पै	०.०५.००
७९	४१५ पै	०.०२.००
८०	४७५पै	०.०७.००
८१	४७६पै	०.१२.००
८२	४७७ पै	०.४१.००
८३	४७८ पै	०.१९.००
८४	४९१ पै	०.१५.००
८५	४९२ पै	०.१८.००
८६	४९३ पै	०.४७.००
८७	४९४	०.६१.००
८८	४९५	०.७१.००
८९	४९६ पै	०.०४.००
९०	४९७ पै	१.२९.००
९१	४९९ पै	०.१५.००
९२	५००	०.६०.००
९३	५०१	०.९४.००
९४	५०२	०.५०.००
९५	५०३	०.४२.००
९६	५०४	१.५७.००
९७	५०५	१.४५.००
९८	५०६पै	१.१६.००
९९	५०७	०.८९.००
१००	५०८ पै	०.५०.००
१०१	५१० पै	०.१०.००
१०२	५११ पै	०.२६.००
१०३	५१५ पै	१.५६.००
	एकूण	**३६.४४.००**
	सरकारी क्षेत्र	**१.९५.००**
	एकूण संपादन क्षेत्र	**३८.३९.००**

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण.

प्रकल्पाचे नाव – लघु पाटबंधारे योजना मौजे कोलेवाडी, ता.लांजा, जि. रत्नागिरी.

प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन – लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

सामाजाला मिळणारे लाभ– या प्रकल्पामुळे २४९ हेक्टर आर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे कृषि उत्पादनामध्ये वाढ होऊन, मुबलक हिरवा चारा निर्माण होणार आहे. पशुपालन, दुग्धव्यवसाय, शेती, फळबाग लागवड होऊन गावामध्ये स्थानिकांना व सभोवतालच्या गावातील लोकांना रोजगार मिळवून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा वाढणार आहे. रोजगारासाठी स्थलांतरित झालेली कुटुंबे परत गावात येतील. पाणी साठ्यामुळे मत्स्यपालन, बोटिंग, मासेमारी इत्यादी मुळ पर्यटनात वाढ होईल. अशी शिफारसही भाकर सेवा संस्था कोंड्गे, ता. लांजा यांनी केलेली आहे.

अनुसूची तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

कोलेवाडी लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही म्हणून बाधित कुटुंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेली सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)

सचिव, भाकर सेवा संस्था, लांजा यांजकडील क्रमांक SIA/२८५/२०२४, दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ अन्वये दिलेल्या प्रमाणपत्रानुसार कोलेवाडी लघु पाटबंधारे प्रकल्पाचे सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्ट्या कोणताही दुष्परिणाम आढळून येत नाही. सामाजिक परिणाम निर्धारण (SIA) पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे, असे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

अनुसूची पाच

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटूंबे नाहीत, त्यामुळे पुनर्वसन व पुनर्वसाहतीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

टीप.-उक्त जमिनीच्या नकाशाचे, उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजापूर या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

डॉ. जॅसमिन,
सहायक जिल्हाधिकारी (भा.प्र.से.)
तथा उपविभागीय अधिकारी, राजापूर.

राजापूर,
दिनांक १२ फेब्रुवारी २०२६.

नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २० मार्च २०२६.

शुद्धिपत्रक

वाचा–शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२३/१६११/प्र.क्र.१२३/२३/एसएम/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस-१२२३क/१६११/प्र.क्र.१२४/२४/एसएम/शुद्धिपत्र नवि-१२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन नगरविकास विभागाने वाडा नगर पंचायत क्षेत्राची प्रारूप विकास योजना त्यामधील सारभूत स्वरूपाचे बदल वगळून अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२३/१६११/प्र.क्र.१२३/२३/एसएम/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५ अन्वये (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिसूचना' असा करण्यात आला आहे) उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये विशेषत्वाने नमूद केल्यानुसार एसएम-१ ते एसएम-०९ यासह मंजूर केली आहे.

आणि ज्याअर्थी, आ.क्र.३६- सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट या आरक्षणाचे स्थानांतरण मौजे वाडा येथील सं.नं.२२९ या भूखंडावर सूचना क्रमांक टीपीएस-१२२३/१६११/प्र.क्र.१२३/२३/ईपी/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२४ व क्रमांक टीपीएस-१२२३/१६११/प्र.क्र.१२३/२४/ईपी/शुध्दीपत्रक/नवि-१२, दिनांक २० मार्च २०२६ अन्वये प्रस्तावित असल्याने, उक्त अधिसुचनेसोबत जोडलेल्या परिशिष्ट-३ च्या अ.क्र.१ येथील एसएम-१ वगळणे आवश्यक असल्याने त्याकरीता , शासन खालीलप्रमाणे शुद्धीपत्रक निर्गमित करीत आहे.

शुद्धिपत्रक

अधिसूचना क्रमाक टीपीएस-१२२३/१६११/प्र.क्र.१२३/२३/एसएम/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२४ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-३ मधील अ.क्र.१ येथील एसएम-१ वगळण्यात येत आहे.

२. उक्त शुद्धिपत्रक नागरिकांच्या अवलोकनार्थ सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई, सहायक संचालक नगररचना, पालघर शाखा, जि. पालघर व मुख्याधिकारी, वाडा नगर पंचायत, वाडा, जि.पालघर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत १ महिन्याच्या कालावधीकरीता उपलब्ध राहील.

३. सदरचे शुद्धिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे. (कायदे व नियम)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

निर्मलकुमार चौधरी,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 20th March 2026.

CORRIGENDUM

Read :- Government Notification No. TPS-1223/1611/C.R.123/23/SM/UD-12, dated 30th April 2025.

No. TPS-1223/1611/C.R.123/24/SM/Corrigendum/UD-12.—Whereas, in exercise of the powers conferred under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act "), the Government in Urban Development Department has sanctioned the the Draft Development Plan of the Wada Nagar Panchayat area excluding the substaintial modifications *vide* Notification No. TPS-1223/1611/C.R.123/23/SM/ UD-12, dated 30th April 2025 (hereinafter referred to as " the said notification") more specifically derscribed in the Schedule-A as SM-01 to SM-09 attached with the said notification ;

And whereas, it is observed that Location of Site No. 36-Sewage Treatment Plant is proposed to be shifted on the land bearing S.No. 229 of village Wada as described in EP-06 and EP-32 publised *vide* notice No . TPS-1223/1611/ C.R.123/23/EP/UD-12, dated 30th April 2025 and No. TPS-1223/1611/C.R.123/24/ EP/Corrigendum/UD-12, dated 20th March 2026 respectively, the sanctioned modification SM-01 at Sr. No. 1 in Schedule-A attached with the said notification is needs to be deleted and for that purpose it is necessary to issue corrigendum for the same ;

Now, therefore, Government issues this corrigendum to the said notification as described below:

Corrigendum

The sanctioned modification SM-01 at Sr. No. 1 in Schedule-A attached with the notification TPS-1223/1611/C.R.123/23/SM/ UD-12, dated 30th April 2025 is deleted.

2. This Corrigendum shall be kept for inspection of the general public during office hours on all working days in the office of the the Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai, the Assistant Director of Town Planning, Palghar Branch, Palghar and Chief Officer, Wada Nagar Panchayat, Wada, Dist. Palghar for the period of one month.

3. This Corrigendum is also available on the Government website www.*maharashtra.gov.in* (Acts/Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra.

NIRMALKUMAR CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २० मार्च २०२६.

शुद्धिपत्रक

वाचा.—शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२३/११५६/प्र.क्र.११६/२४/एसएम/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टिपीएस-१२२३/११५६/प्र.क्र.११६/२४/एसएम/शुद्धिपत्रक/नवि-१२.—महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक टिपीएस १२२३/११५६/प्र.क्र.११६/२४/एसएम/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये तळा नगरपंचायत क्षेत्राची प्रारूप विकास योजनेमधील सारभूत स्वरुपांचे बदल वगळून उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद एसएम-०१ ते एसएम-०३ या सह मंजूर केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेमध्ये एसएम-०३ चा वगळलेल्या भागाच्या सूचना क्रमांक TPS-१२२३/११५६/CR-११६/२४/EP/UD-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५ मधील ईपी क्र. ०२ मध्ये समावेश असल्याने शासन खालीलप्रमाणे शुद्धिपत्रक निर्गमित करीत आहे.

शुद्धिपत्रक

The sanctioned modificaion SM-03 at Sr. No. 3 in Schedule-A attached with the said notification is deleted.

२. उक्त शुद्धिपत्रक खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत १ महिन्याच्या कालावधीकरिता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) मुख्याधिकारी, नगरपंचायत तळा, तळा, जि. रायगड.

(२) जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग.

(३) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई.

(४) सहायक संचालक नगररचना, रायगड-अलिबाग शाखा.

३. सदरचे शुद्धिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहे. (कायदे व नियम)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

निर्मलकुमार चौधरी,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 20th March 2026.

CORRIGENDUM

Read.—Government in Urban Development Department's Notification No. TPS-1223/1156/ C.R.116/24/ SM/UD-12, dated 30th April 2025.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-1223/1156/C.R.116/24/SM/Corrigendum/UD-12.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 31 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act"), the Development Plan of Tala, Nagar Panchayat was sanctioned and published in the *Maharashtra Government Gazette* under Notification No. TPS-1223/1156/CR-116/24/SM/UD-12, dated 30th April 2025 along with sanction modifications mentioned in schedule-A (hereinafter referred to as "the said Notification") more specifically derscribed in the Schedule-A as SM-01 to SM-03 attached with the said notification ;

And Whereas, it is observed that Modification SM 03 is already included in notice number No.TPS-1223/1156/CR-116/24/EP/UD-12, dated 30th April 2025. the sanctioned modification SM-03 at Sr. No. 3 in Schedule-A attached with the said notification is needs to be deleted and for that purpose it is necessary to issue corrigendum for the same ;

Now, therefore, Government issues this corrigendum to the said notification as described below :—

CORRIGENDUM

The sanctioned modification SM-03 at Sr. No. 3 in Schedule-A attached with the Notification No. TPS-1223/1156/CR-116/24/SM/UD-12, dated 30th April 2025 is deleted.

2. This Corrigendum shall be kept for inspection of the general public during office hours on all working days at the following offices for the period of one month :—

(1) The Chief Officer, Municipal Council, Tala, District Raigad.

(2) The Collector, Raigad.

(3) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai.

(4) The Assistant Director of Town Planning, Raigad-Alibaug Branch, Alibaug.

3. This Corrigendum is also available on the Government website www.*maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra.

NIRMALKUMAR CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मार्च २०२६.

शुद्धिपत्रक

वाचा.— शासन नगरविकास विभागाची सूचना क्रमांक टिपीएस-१२२३/१४९५/प्र.क्र.१०२/२४/ईपी/नवि-१२, दिनांक २४ जून २०२५.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस-१२२३/१४९५/प्र.क्र.१०२/२४/ईपी/शुद्धिपत्रक/नवि-१२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार माणगाव नगर पंचायत विकास योजनेस अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२२३/१४९५/प्र.क्र.१०२/२४/ईपी/नवि-१२, दिनांक २४ जून २०२५, अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. आणि ज्याअर्थी, शासनाने प्रस्तावित केलेले उक्त प्रारूप सुधारित विकास योजनेत दर्शविलेले ई.पी.-१ ते ई.पी.-२९ म्हणून निर्देशित केलेले फेरबदल हे सारभूत स्वरूपाचे असल्याने सदर फेरबदल उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये स्वतंत्रपणे क्रमांक टिपीएस-१२२३/१४९५/प्र.क्र.१०२/२४/ईपी/नवि-१२, दिनांक २४ जून २०२५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचनेमध्ये काही त्रुट्या दुरुस्त करणे आवश्यक असून त्याकरिता उक्त सूचनेस शुद्धिपत्रक निर्गमित करणे आवश्यक असल्याने, शासन खालीलप्रमाणे शुद्धिपत्रक निर्गमित करीत आहे :—

शुद्धिपत्रक

Sr. No.	Instead of	Read as
EP - 05 (Schedule – B) Column 4	Residential Zone (In Column 4)	**Forest Zone**(In Column 4)
EP – 07 (Schedule – B) Column 5 & 6	i. S.No.67/4/A. (In Column 5 & 6)	i. S. No. 67/4/A and **67/4/B Part** (In Column 5 & 6)
EP – 08 (Schedule – B) Column 4	Green Zone(In Column 4)	**Forest Zone**(In Column 4)
EP – 12 (Schedule – B) Column 5 & 6	i. New reservation No. 43 '(In Column 5 & 6)	i. New reservation No**. 42** (In Column 5 & 6)
EP – 17 (Schedule – B) Column 4	Residential Zone/Green Zone(In Column 4)	Residential Zone/**Forest Zone/ Agriculture Zone/Industrial Zone/ Green belt** (In Column 4)
EP – 27 (Schedule – B) Column 6	It is to be proposed that 9.0m DP road is deleted and only sanctioned layout road further extended to 12.0 m wide Development Plan Road as shown on plan. (In Column 6)	(i) Sanctioned layout in village S. No. 62 Village Uttekhol to be shown on Draft DP. (ii) Proposed 9 m wide DP road is deleted and included in residential zone. and 9 m sanctioned layout road is proposed as 9.0m DP Road and further extended to 12.0 m wide Development Plan road on East and West side and further extended on west side till 9 m wide DP road as shown on plan. (In Column 6)

२. उक्त शुद्धिपत्रक खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत १ महिन्याच्या कालावधीकरिता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) मुख्याधिकारी, नगरपंचायत माणगाव, माणगाव ,जि. रायगड.

(२) जिल्हाधिकारी, रायगड –अलिबाग.

(३) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई.

(४) सहायक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग शाखा.

३. सदरचे शुद्धिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहे. (कायदे व नियम)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

निर्मलकुमार चौधरी,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 20th March 2026.

CORRIGENDUM

Read :- Government in Urban Development Department's Notice No. TPS-1223/1495/ CR-102/24/EP/UD-12, dated 24th June 2025.

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. TPS-1223/1495/CR-102/24/ EP/ Corrigendum /UD-12. —Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 31 Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act "), the Development Plan of Mangaon Nagar panchayat was sanctioned and Some modifications proposed to be made by the Government being of Substantial Nature as shown in Schedule – B where published in the *Maharashtra Government Gazette* under Notice No. TPS-1223/1495/CR-102/24/EP/UD-12, dated the 24th June 2025 (hereinafter referred to as " the said Notice ") ;

And whereas, it is observed that some errors are needed to be corrected in accordance with the Government Approval and for that purpose it is necessary to issue corrigendum for the same.

Now, therefore, Government issues this Corrigendum to the said Notification as described below :—

CORRIGENDUM

Sr. No.	Instead of	Read as
EP - 05 (Schedule – B) Column 4	Residential Zone (In Column 4)	**Forest Zone**(In Column 4)
EP – 07 (Schedule – B) Column 5 & 6	i. S.No. 67/4/A. (In Column 5 & 6)	i. S. No. 67/4/A and **67/4/B Part** (In Column 5 & 6)
EP – 08 (Schedule – B) Column 4	Green Zone(In Column 4)	**Forest Zone**(In Column 4)
EP – 12 (Schedule – B) Column 5 & 6	i. New reservation No. 43 '(In Column 5 &6)	i.New reservation No.**42** (In Column 5 & 6)
EP – 17 (Schedule – B) Column 4	Residential zone/Green Zone(In Column 4)	Residential Zone/**Forest Zone/ Agriculture Zone/Industrial Zone/ Green belt**(In Column 4)
EP – 27 (Schedule – B) Column 6	It is to be proposed that 9.0m DP road is deleted and only sanctioned layout road further extended to 12.0 m wide Development Plan Road as shown on plan. (In Column 6)	(i) Sanctioned layout in village S. No 62 Village Uttekhol to be shown on Draft DP. (ii) Proposed 9 m wide DP road is deleted and included in residential zone. and 9 m sanctioned layout road is proposed as 9.0m DP Road and further extended to 12.0 m wide Development Plan road on East and West side and further extended on west side till 9 m wide DP road as shown on plan. (In Column 6)

2. This Corrigendum shall be kept for inspection of the general public during office hours on all working days at the following offices for the period of one month :-—

(1) The Chief Officer, Municipal Council, Mangaon, District Raigad.

(2) The Collector, Raigad.

(3) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai.

(4) The Assistant Director of Town Planning, Raigad-Alibaug Branch, Alibaug.

3. This Corrigendum is also available on the Government website *www.maharashtra.gov.in.* (Acts/Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NIRMALKUMAR CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २० मार्च २०२६.

शुद्धिपत्रक

वाचा.– शासन नगरविकास विभागाची सूचना क्रमांक टीपीएस-१२२३/११५६/प्र.क्र.११६/२४/ईपी/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२४.

क्रमांक टीपीएस-१२२३/११५६/प्र.क्र.११६/२४/ईपी/शुद्धिपत्रक/नवि-१२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार तळा नगर पंचायत विकास योजनेस अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२३/१५६/प्र.क्र.११६/२४/एसएम/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५ अन्वये मंजूर देण्यात आली आहे. आणि ज्याअर्थी, शासनाने प्रस्तावित केलेले उक्त प्रारूप सुधारित विकास योजनेता दर्शविलेले ई.पी.-१ ते ई.पी.-११ म्हणून निर्देशित केलेले फेरबदल हे सारभूत स्वरूपाचे असल्याने सदर फेरबदल उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये स्वतंत्रपणे क्रमांक टीपीएस-१२२३/१५६/प्र.क्र.११६/२४/ईपी/नवि-१२, दिनांक ३० एप्रिल २०२५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचनेमध्ये काही त्रुट्या दुरुस्त करणे आवश्यक असून त्याकरिता उक्त सूचनेस शुद्धिपत्रक निर्गमित करणे आवश्यक असल्याने, शासन खालीलप्रमाणे शुद्धिपत्रक निर्गमित करीत आहे.

Sr. No.	Instead of	Read as
(1) EP - 01 (Schedule–B) Column 6	**(i) Vegetable Market & Shopping Center** **(ii) Primary School & Play Ground**	**(i) Primary School & Play Ground** **(ii) Vegetable Market & Shopping Center**
(2) EP - 02 (Schedule –B) Column 6	(vi) It is proposed road along the East side of S., No. 91, 92, 93, & 95 and West Side of Residential Zone as shown on Plan.	At the beginning of the entry, the following line shall be inserted: " Modification under Section 30 is proposed to be sanctioned. However ," **(vi) Entry stands to be Deleted.**
(3) EP - 03 (Schedule –B) Column 6	S. No. 44 pt	At the beginning of the entry, the following line shall be inserted: "Modification under Section 30 is proposed to be sanctioned. However, " **S. No. 49 pt**
(4) EP - 11 (Schedule –B) Column 6	843 pt.	**842 pt., & 801 pt.**

२. उक्त शुद्धिपत्रक खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत १ महिन्याच्या कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) मुख्याधिकारी, नगर पंचायत तळा, तळा, जि. रायगड.

(२) जिल्हाधिकारी, रायगड –अलिबाग.

